महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत
ओम सुपर मार्केट जवळ, बहिरट पाटील चौक,
शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/गौण बांधकाम/२०२३/ 2543 दिनांक : 08 JUN 2023

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था.
पुणे विभाग

**विषय : -** **सन २०२३-२४ वर्षाकरीता तातडीच्या गौण बांधकामांचे प्रस्ताव सादर करणेबाबत..**
**संदर्भ :-** मा. उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.९/नियोजन/गौण बांधकाम/२०२३/१९३ दि. ०५.०६.२०२३

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रामध्ये नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांशी निगडीत तातडीच्या स्थापत्य व विद्युत विषयक गौण बांधकामाकरीता, संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय अभियांत्रिकी औषधनिर्माशास्त्र पदवी/पदविका संस्थांतील तातडीची कामे करण्याकरीता संचालनालयास गौण बांधकामे (२२०३०४११) या योजनेखाली निधी प्राप्त होतो. सन २०२३-२४ करीता देखील सदर योजनेत निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत/कार्यालयात विद्यार्थ्यांशी निगडीत असलेल्या तातडीच्या **स्थापत्य व विद्युत विषयक गौण बांधकामाचे एकूण ०२ प्रतित प्रस्ताव थेट तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (कार्यासन क्र. ९) यांना दिनांक ३०.०६.२०२३ रोजीपर्यंत सादर करण्यात यावेत** व प्रस्तावाची ०१ प्रत या विभागीय कार्यालयास सादर करण्यात यावी. तसेच प्रस्ताव सादर करताना सोबत जोडलेल्या उपरोक्त संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन पत्रामध्ये नमूद बाबींचा प्रस्ताव सादर करताना समावेश करण्यात यावा.

सोबत : संदर्भीय पत्र.

**(डॉ.द.व्यं.जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597429/490,
ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक: ९/नियोजन/गौण बांधकाम/२०२३/९८३ दिनांक :- 05 JUN 2023

प्रति,

१) सह संचालक,
सर्व विभागीय कार्यालये,

२) प्राचार्य,
सर्व शासकीय अभि./औ.नि.शा. महाविद्यालये

३) प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
07 JUN 2023
आवक क्र. ५०९८

विषय :- सन २०२३-२४ वर्षाकरीता तातडीच्या गौण बांधकामांचे प्रस्ताव सादर करणेबाबत...

विद्यार्थ्यांशी निगडीत तातडीच्या स्थापत्य व विद्युत विषयक गौण बांधकामांकरीता, तंत्रशिक्षण संचालनालय, विभागीय कार्यालये तसेच संचालनालयाच्या अधिपत्त्याखालील सर्व शासकीय अभियांत्रीकी-औषधनिर्माणशास्त्र पदवी / पदविका संस्थांतील तातडीची कामे करण्याकरीता संचालनालयास गौण बांधकामे (२२०३०४११) या योजनेखाली निधी प्राप्त होतो. सन २०२३-२४ करीता देखील सदर योजनेत निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

सर्व विभागीय कार्यालये तसेच त्यांच्या अधिपत्त्याखाली शासकीय पदवी / पदविका संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत / कार्यालयात विद्यार्थ्यांशी निगडीत असलेल्या तातडीच्या स्थापत्य व विद्युत विषयक गौण बांधकांचे प्रस्ताव या कार्यालयास दि. ३० जून २०२३ पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने सादर करावेत. सदर प्रस्ताव सादर करताना खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

१. संस्थेच्या गरजेनुसार गौण बांधकामाचे प्रस्ताव संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करुन घेण्यात यावेत.
२. सा.बा. विभागाने तयार केलेल्या प्रस्तावावर विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकीत (तांत्रीक मान्यता) करणे आवश्यक आहे.
३. सादर करण्यात येणाऱ्या एका प्रस्तावाची अंदाजपत्रकीय रक्कम कमाल ३ लाखाच्या आत असणे आवश्यक आहे.
४. मंजूर झालेल्या कामाची रक्कम संबंधीत सा.बां. विभागास अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यासाठी संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोषागार क्रमांक व आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक नमूद करण्यात यावा. सदर सांकेतांक नमूद नसलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

विवि
07.6.2023

५. तयार करण्यात आलेली खर्चाची अंदापत्रके चालू दरसूचीवर ( current DSR) आधारीत असणे आवश्यक आहेत.

६. अंदाजपत्रकासोबत प्रस्तावित कामाचे सुस्पष्ट फोटो सादर करावेत. तसेच फोटो ई-मेल द्वारे देखील सादर करावेत.

७. अर्थसंकल्पित असलेल्या निधीपैकी शासनामार्फत निधी प्रत्याक्षात वितरीत होण्याच्या मर्यादेत प्राप्त कामांना मंजूरी देण्यात येईल.

८. कामांना मंजूरी प्राप्त झाल्यानंतर व अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे निधी वितरीत केल्यानंतर संबंधीत संस्थेने, संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागास संपर्क साधून काम लवकरात लवकर पूर्ण करून घेण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील.

९. सन- २०२२-२३ या अर्थिक वर्षामध्ये स्वेच्छा अनुदानातून विभागीय कार्यालयातील/संस्थेतील स्थापत्य विषयक/विद्युत विषयक किरकोळ दुरुस्ती गौण कामांना मंजुरी प्रदान करण्यात आलेल्या कामांचे भौतिक अहवाल/उपयोगिता प्रमाण-पत्र संबंधित सा.बां.वि. कडून प्राप्त करण्यात येवून दि- ३० जून, २०२३ पर्यंत या संचालनालयास सादर करण्यात यावीत.

गौण बांधकामा अंतर्गत प्राप्त प्रस्तावास संचालनाल्या स्तरावर खालीलप्रमाणे कालावधीमध्ये कार्यवाही करण्यात येईल.

| क्र | तपशील | कार्यवाहीचा शेवटचा दिनांक |
|---|---|---|
| १ | संचालनाव्दारे गौण बांधकामाचे प्रस्ताव स्विकारणे | ३०-०६-२०२३ |
| २ | संचालनालय स्तरावर प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन दुरुस्ती कामांची आवश्यकतेनुसार प्राधान्यक्रम ठरविणे. | १०-०७-२०२३ |
| ३ | प्राधान्यक्रमनुसार अनुदान वाटप | अनुदान उपलब्धतेनुसार |

शासनामार्फत टप्प्याटप्प्याने निधी वितरीत होत असल्यामुळे दि. ३० जून, २०२३ पर्यंत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचाच विचार केला जाणार असून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची तातडी व प्राधान्यक्रम ठरवून प्रस्ताव निकाली काढण्यात येतील. तदनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव हे प्रतिक्षाधीन ठेवण्यात येतील व शासनामार्फत पुढील टप्प्यात प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेत शिल्लक प्रस्तावांचा विचार करण्यात येईल.

(डॉ. धनपाल कांबळे)

उपसंचालक,

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई.